शनिवार, ७ जुलै २०१८

अंकासोबत स्मार्ट पुरवणी

पुण्य नगरी

॥मुंबई ॥ वर्ष :१९ ॥ अंक : ०९४ ॥ पाने १२+४=१६ ॥ किंमत : ४.०० www.epunyanagari.com ॥ Call Center : 18001206252

# वृक्षारोपणअभियान व स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन

**॥ मुंबई :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने वर्धापन दिनाचे औचित्य साधत शासनाच्या वृक्षारोपण अभियानाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रात केले आहे. राज्याचे कामगार मंत्री संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या निर्देशानुसार राज्यातील कामगार कल्याण केंद्रातून कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन करण्यात आले. राज्यातील सर्व केंद्रात व केंद्र परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतला आहे. या सप्ताहात वृक्ष दिंडी, पर्यावरणावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा, परिसंवाद, व्याख्यान आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी सांगितले.

मंडळाच्या ६५व्या वर्धापन दिनानिमित्त कामगार क्रीडा भवन, एलफिन्स्टन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वर्धापन दिन सोहळ्यास आमदार कालिदास कोळंबकर, माजी महापौर महादेव देवळे, कामगार नेते गोविंदराव



मोहिते, माजी मंडळ सदस्या डॉ. चेतना दीक्षित छत्रपती पुरस्कार विजेते क्रीडापटू छाया व जया शेट्टी, नरेंद्र चिपळूणकर, लोकशाहीर खामकर, गुणवंत कामगार संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र म्हात्रे, कामगार लेखक मनोहर धोत्रे, कामगार रंगकर्मी सत्यवान धुरी व सूरप्रवाह संस्थेचे कलाकार विविध आस्थापनाचे प्रतिनिधी व कामगार तसेच पत्रकार आदी आवर्जून उपस्थित होते.

आमदार कालिदास कोळंबकर यांनी सांगितले की, कामगार व कामगार कुटुंबीयांना मंडळाच्या विविध कार्यक्रम, उपक्रम व योजनांमुळे आजपर्यंत चांगला लाभ झाला आहे. मंडळ कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी राबवत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, विविध स्वयंरोजगार वर्ग विषेशतः वाहन चालक प्रशिक्षण वर्ग व विदेशी भाषा प्रशिक्षण वर्ग याचा देखील कामगार व कामगार कुटुंबीय मोठ्या प्रमाणात लाभ घेतील, असा विश्वास आहे, असे कोळंबकर म्हणाले.

शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई ■ गुरुवार, ५ जुलै २०१८ ■ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००५/१८६८१ ■ वर्ष १४ ■ अंक २६१ ■ पाने १२ (मुंबई प्रहारसह) ■ ₹ ४.००

# कामगार कल्याण मंडळाचा ६५वा वर्धापन दिन संपन्न

## ■ वृक्षारोपण अभियान महाराष्ट्रभर राबविणार
## ■ स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन



**मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा ६५वा वर्धापन दिन नुकताच संपन्न झाला. मंडळाने वर्धापन दिनाचे औचित्य साधत शासनाच्या वृक्षारोपण अभियानाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रात केले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निर्देशानुसार राज्यातील कामगार कल्याण केंद्रातून, कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन केले आहे. राज्यातील सर्व केंद्रांमध्ये व केंद्र परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतला आहे. या सप्ताहात वृक्षदिंडी, पर्यावरणावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा, परिसंवाद, व्याख्यान आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी सांगितले.

मंडळाच्या ६५व्या वर्धापन दिनानिमित्त कामगार क्रीडा भवन, एल्फिन्स्टन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वर्धापन दिन सोहळ्यास आमदार कालिदास कोळंबकर, माजी महापौर महादेव देवळे, कामगार नेते गोविंदराव मोहिते, माजी मंडळ सदस्य डॉ. चेतना दीक्षित, छत्रपती पुरस्कार विजेते क्रीडापटू छाया व जया शेट्टी, नरेंद्र चिपळूणकर, लोकशाहीर खामकर, गुणवंत कामगार संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र म्हात्रे, कामगार लेखक मनोहर धोत्रे, कामगार रंगकर्मी सत्यवान धुरी व सूरप्रवाह संस्थेचे कलाकार विविध आस्थापनांचे प्रतिनिधी व कामगार तसेच पत्रकार आदी आवर्जून उपस्थित होते.

कामगार व कामगार कुटुंबीयांना मंडळाच्या विविध कार्यक्रम, उपक्रम व योजनांमुळे आजपर्यंत चांगला लाभ झालेला आहे. मंडळ कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी राबवीत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, विविध स्वयंरोजगार वर्ग विशेषतः वाहनचालक प्रशिक्षण वर्ग व विदेशी भाषा प्रशिक्षण वर्ग याचाही कामगार व कामगार कुटुंबीय लाभ घेतील, असा विश्वास आमदार कालिदास कोळंबकर यांनी यावेळी व्यक्त केला.

आपला
वार्ताहर
मुंबई, वर्ष २४, अंक २६६★ शनिवार, ७ जुलै २०१८ पाने १२, किंमत ४.०० रु.

# कामगार कल्याण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण अभियान व स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन

मुंबई, दि. ६ - महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा ६५ वा वर्धापन दिन नुकताच संपन्न झाला. मंडळाने वर्धापन दिनाचे औचित्य साधत शासनाच्या वृक्षारोपण अभियानाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रात केले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निर्देशानुसार राज्यातील कामगार कल्याण केंद्रातून, कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग नोंदणीचे आवाहन करण्यात आले. राज्यातील सर्व केंद्रांत व केंद्र परिसरात वृक्षरोपण कार्यक्रम हाती घेतला आहे. या सप्ताहात वृक्ष दिंडी, पर्यावरणावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा, परिसंवाद, व्याख्यान आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी सांगितले.

मंडळाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त कामगार क्रीडा भवन, एलफिन्स्टन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वर्धापन दिन सोहळ्यास





आमदार कालिदास कोळंबकर, माजी महापौर महादेव देवळे, कामगार नेते गोविंदराव मोहिते, माजी मंडळ सदस्या डॉ. चेतना दीक्षित, छत्रपती पुरस्कार विजेते क्रीडापटू छाया व जया शेट्टी, नरेंद्र चिपळूणकर, लोकशाहीर खामकर, गुणवंत कामगार संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र म्हात्रे, कामगार लेखक मनोहर धोत्रे, कामगार रंगकर्मी सत्यवान धुरी व सुरप्रवाह संस्थेचे कलाकार विविध आस्थापनाचे प्रतिनिधी व कामगार तसेच पत्रकार आदी आवर्जून उपस्थित होते.

आमदार कालिदास कोळंबकर यांनी सांगितले की, कामगार व कामगार कुटुंबीयांना मंडळाच्या विविध कार्यक्रम, उपक्रम व योजनांमुळे आजपर्यंत चांगला लाभ झालेला आहे. मंडळ कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी राबवीत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, विविध स्वयंरोजगार वर्ग विषेतः वाहन चालक प्रशिक्षण वर्ग व विदेशी भाषा प्रशिक्षण वर्ग याचा देखील कामगार व कामगार कुटुंबीय मोठ्या प्रमाणात लाभ घेतील, असा मला विश्वास आहे.